Maharashtra State Board of Secondary and Higher SecondaryEducation,
Kolhapur Divisional Board Kolhapur-416004
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**
Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103
E-Mail: divsec.kop@gmil.com
Web : sscboardkolhapur.in

कोविमं/डीपी/प्रकटन/ 1845
दिनांक - २२/०९/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ. १० वी ) फेब्रु./मार्च - २०२३ परीक्षांच्या संभाव्य वेळापत्रकाबाबत.**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) फेब्रुवारी / मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक या विभागीय मंडळाच्या sscboardkolhapur.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर वेळापत्रकाबाबतची बाब आपल्या शाळेतील शिक्षक, संबंधित विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणावी.

(डी.एस.पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत: प्रकटन

प्रत माहितीस्तव सादर -
मा.सचिव,
राज्य मंडळ, पुणे

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी–मार्च २०२३ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

## प्र क ट न

फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षा खालील संभाव्य कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व व्दिलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम | मंगळवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२३ ते सोमवार दि. २० मार्च २०२३ |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा | गुरूवार दि. ०२ मार्च २०२३ ते शनिवार दि. २५ मार्च २०२३ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर संभाव्य वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.in संकेतस्थळावर दि. १९.०९.२०२२ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी–मार्च २०२३ च्या लेखी परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील संभाव्य वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल.

सदर वेळापत्रकांबाबत काही सूचना, हरकती असल्यास त्या विभागीय मंडळाकडे तसेच राज्य मंडळाकडे १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात पाठवाव्यात. तदुनंतर प्राप्त होणाऱ्या सूचनांवर विचार केला जाणार नाही.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १९.०९.२०२२

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

Desktop/2023 time table